OFFICE ... JOINT DISTRICT REGISTRAR NASIK, MAHARASHTRA

भारत STAMP DUTY महाराष्ट्र
SPECIAL ADHESIVE
Rs.≈0017360/- 18.7.01
281989 00043
INDIA MAHARASHTRA
# 1118042017

Rupees Seventeen Thousand three Hundred Sixty Only

Rs 17360/-

PROPER OFFICER
Collector of Stamps
NASHIK.
18 JUL 2001

| नसन १ |
|---|
| ७७९५/१.१५ |
| २००१ |

खरेदीखत रक्कम रुपये : १,९५,०००/-
मूल्यांकन रक्कम रुपये : २,१७,०००/-
स्टॅम्पड्युटि रक्कम रुपये : १७,३६०/-

//श्री//

-:-फरोक्त खरेदीखत -:-

आज तारीख १८ माहे जुलै इसवी सन २००१रोजी ते दिवशी नाशिक मुक्कामी-

नसन १
९७९५/२१४५
२००१

सौ. जयश्री नित्यानंद भामरे उ.व. ४०
व्यवसाय :नोकरी,
राहणार :डी.टी.१७/ सिध्दी विनायक,
सरकारी वसाहत,शरणपूर पोलीस चौकीजवळ,
त्र्यंबक रोड ,नासिक

लिहुन घेणार

यांसी,

१) श्रीमती,बद्रुन्निसा महेमुदखान पठाण,
२) श्री.इकबाल महेमुदखान पठाण,
३) श्री.खलिल महेमुदखान पठाण,
४) श्री.खालिद महेमुदखान पठाण
५) श्री.नादीर खलील पठाण
६) श्रीमती,नजमुन्नीसा रमजानखान पठाण
७) अल्ताफमुन्नीसा अब्दुलसमद शेख,
८) सादिक सर्फराज पठाण,
९) कमरुनिस्सा महंमद शाफियोदीन शेख
१०) अंजुमंदबानो इकबाल शेख
अ) इकबाल महंमद शेख,
ब) कु.निगार इकबाल शेख,
क) मुकीद इकबाल शेख
अज्ञानपालन नंबर२ इकबाल महंमद शेख,
सर्व राहणार-रेणुकानगर, नाशिक.
११)श्रीमती,जैबुन्नीसा अब्दुललतीफ पठाण
१२)श्री.शफिक अब्दुल लतीफ पठाण
१३)श्री.अख्तर अब्दुललतीफ पठाण
१४)सौ.शकीरा दबीर शेख,
१५)सौ.नसीम रसिद खान
१६)सौ.फहमिदा महंमदहुसैन शेख,
अ.नं.११ते१२ या सर्वाचे जनरल मुखत्यार
पत्रधारक-विराज इस्टेट प्रा.लि.चे संचालक

लिहुन देणार

नसन १
९७९५/३-९५
२००१



श्री.विलास रसिकलाल शाह उ.व.४१
व्यवसाय-शेती व व्यापार,
रा. अभ्यंकर टॉवर्स, ४था मजला, महात्मा
गांधीरोड, नासिक. यांचे जनरल मुखत्यार
पत्रधारक -श्री.चंदशेखर बाबुलाल शाह,
१७) श्री.अमृतराव त्र्यंबकशेठ खैरनार
१८) श्री.सतिश दत्तात्रेय चव्हाण,
१९) श्री.निंबादास नथु बागुल
२०)सौ.कल्पना शांताराम सावळे
२१)श्री.शशीकांत पुंडलिक वाणी
२२)श्री.रविंद्र पंढरीनाथ जगताप
२३)श्री.उदयकांत तुकाराम साखरेकर
२४)श्री.विजय अमृतराव खैरनार
२५)कु. रुपाली शांताराम साबळे
२६)सौ. अनिता नितीन बागुल
२७)श्री.पुंडलिक वेडुशेठ वाणी
२८) श्री.संजय तुकाराम साखरेकर
२९) श्री.रांजेद तुकाराम साखरेकर
३०)सौ.उषा शांताराम साबळे
३१)सौ. कल्याणी आनंद पवार
लिहुन देणार नंबर १७ ते २० व २१
ते ३२ तर्फे जनरल मुखत्यारपत्रधारक म्हणुन
नंबर २१ श्री.शशीकांत पुंडलिक वाणी,
या सर्वाचे जनरल मुखत्यारपत्रधारक-
मिनल एंटरपाईजेस पोपायटरी फर्म तफे
पोपारायटर-श्री.विलास रसिकलाल शाह
व्यवसाय-व्यापार, यांचे जनरल मुखत्यारपत्रधारक
श्री. चंदशेखर बाबुलाल शाह
वरील १ ते ३२ यांचे तर्फे जनरल मुखत्यारपत्र
धारक मे.नेत्रा कन्स्ट्रक्शन भागिदारी फर्म तर्फे

लिहुन देणार

नसन १
७९५/१९९
२००१

**भागिदार- श्री. संतोष विश्वनाथ कारखानीस**
उ.व.२४व्यवसाय-व्यापार, राहणार-१अंबिका,मेरी कॉलनीजवळ,दिंडोरीरोड नासिक.

**- यांसी-**

**मे. नेत्रा कन्स्ट्रक्शन** भागिदारी फर्म तर्फे भागिदार- **श्री. संतोष विश्वनाथ कारखानीस**, उ.व.२४ व्यवसाय-व्यापार, राहणार-**१,अंबिका,मेरी कॉलनी जवळ, दिंडोरीरोड,नासिक** — संमती देणार नंबर १

**-व-**

**मे. एन् .के. बिल्डर्स,भागिदारी फर्म तर्फे भागिदार-सौ.प्रज्ञा विठठ्ल खानकरी,उ.व.३६, व्यवसाय-शेती व व्यापार राहणार-डबीर अपार्टमेन्ट,गोळे कॉलनी, नासिक. २** — संमती देणार नंबर२

**-कारणे फरोक्त खरेदीखत लिहुन देतो ऐसा जे की,-**

**(१) मिळकतीचे वर्णन ;-** तुकडी नाशिकपैकी तालुका व जिल्हा नाशिक पैकी नाशिक शिवारांतील नाशिक महानगरपालिका हददीतील रहिवासी भागा तील मिळकत यांसी सर्व्हे नंबर ७६२/२/१+७६२/२/२व स.नं. ७६३ /१ / १+१/२+७६३/१/३+७६३/१/४पैकी **प्लॉट नंबर ९६ (श्याण्णव) क्षेत्र १६६.५०चौरस मीटर,** यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे -

पर्वेस :-याच लेआऊट मधील प्लॉट नंबर ९७,
, पश्चिमेस :- याच लेआऊट मधील प्लॉट नं. ९५,
दक्षिणेस- ;- याच लेआऊट मधील ६ मीटर रुंदीचा रस्ता,
उत्तरेस :-,-याच लेआऊट मधील प्लॉट नंबर ९२व ९३

७/१२ उता-यास १६६.५० चौरस मीटर क्षेत्र असले तरी जागेवर फक्त १५३.०० चौरस मीटर मोजमापा प्रमाणे भरते,हे लिहुन घेणार यांना मान्य आहे व त्याप्रमाणे लिहुन घेणार यांनी भरणा दिलेला आहे.

नसन १
९७९५/५.९५
२००१

वर वर्णन केलेल्या मिळकतीचा अंतिमरित्या मजूंर लेआऊटप्रमाणे प्लॉट नंबर **९६(श्याण्णव)** आहे .

२) **मालकी हक्काबाबतचा व इतर तपशिल**:- वर कलम १मध्ये नमूद केलेल्या सर्व्हे नंबरची मिळकत श्री.बद्रुन्निसा मेहमूदखान पठाण व इतर(त्यांचा उल्लेख यापुढे जमीनमालक असा केला आहे.)यांचे मालकीची असतांना त्यांनी सदर मिळकतीबाबतचे सर्वराईटस् टायटल व इंटरेस्ट (त्यांचा एकत्रित उल्लेख यापुढे हक्क व अधिकार असा केला आहे.)मेसर्स,नेत्रा् कन्स्टक्शन्( त्यांचा उल्लेख यापुढे संमती देणार नंबर१ असा केंला आहे.)या भागिदारी फर्मचे लांभात विक्री,वर्ग, हस्तांतरीत, असाईन अगर तबदिल केले.त्याबाबत जमीनमालकांनी संमती देणार यांचे लाभांत आवश्यक ते सर्व लेख लिहून दिलेले आहेत.सदरचे लेख आज ही अस्तित्वात आहेत.ते जमीनमालकांनी रध्द् केलेले नाही.अगर ते इतर कोणत्याही कारणाने रध्द झालेले नाही.जमीनमालकांनी संमती देणार नंबर १यांना वर नमूद केलेल्या सर्व्हे नंबरच्या मिळकतीचा प्रत्यक्ष कबजा दिलेला आहे.व संमती देणार नंबर१ यांनी संमती देणार २यांना दिलेला आहे.तो कबजा आजही संमती देणार नंबर २ यांच्याकडे आहे.जमीन मालकांनी संमती देणार नंबर १ यांना सदर मिळकती बाबत दिलेल्या हक्क व अधिकारांचा वापर करुन संमती देणार नंबर १ यांनी सदर मिळकती चा विकास केलेला आहे. सदर मिळकतीमध्ये संमती देणार नंबर १यांनी प्लॉटस् निर्माण केलेले आहेत त्या बाबतचा तपशिल पुढे आलेला आहे.सदर मिळकतीमध्ये निर्माण होणारे प्लॉटस्चा कबजा प्लॉट खरेदीदारांना देण्याचां संमती देणारनंबर २ यांना अधिकार आहे. संमती देणार नंबर १ यांनी जमीन मालकांना वर नमूद केलेल्या सर्व्हेनंबरच्या मिळकतीबाबत ठरलेल्या किमंतीची पूर्ण रक्कम दिलेली आहे.व संमती देणार यांनी आपसांत ठरल्याप्रमाणे संमती देणार नंबर१ यांना रक्कम दिलेली आहे. अशा परिस्थितीत सदरच्या सर्व्हे नंबरच्या मिळकती मधील प्लॉटस् विक्री करण्याचा व त्यापासून मिळणारी किमंतीची रक्कम स्विकारण्यांचा संमती देणार नंबर २ यांना अधिकार आहे.

नसन १
९७९५/६९१५
२००१



तुम्हांस वर कलम १ मध्ये वर्णन केलेला प्लॉट (सदर प्लॉटचा उल्लेख यापुढे सदरची मिळकत असा केलाआहे.) खरेदी घेण्या मध्ये स्वारस्य होते. तुम्ही संमती देणार नंबर २ यांची भेट घेवून सदरचा प्लॉट खरेदी घेण्यांत स्वारस्य दाखविले. उभयपक्षांमध्ये वाटाघाटी झाल्या. त्या सफल झाल्या. संमती देणार नंबर २यांनी सदरचा प्लॉट तुम्हांस कायमचा व फरोक्त खरेदी देण्याचे कबुल केले. त्या बाबत ठरलेल्या अटी व शर्ती अनुसार खरेदीखत तुमचे लांभात लिहून द्यावे ,अशी संमती देणार नंबर २ यांनी आम्हांस विनंती केल्यावरुन आम्ही हे खरेदी खत आजरोजी लिहून दिले आहे.जमीन मालकांनी आमचे लाभांत सदर मिळक तीच्या हस्तातंरणांसाठी जनरल मुखत्यार पत्र लिहून दिलेले आहे.ते तुम्ही पाहिले आहे.सदरचे मुखत्यार पत्रआजही अस्तित्वातं असून ते कोणत्याही कारणांने रध्द् झालेले नाही. जमीन मालकांचे मुखत्यार म्हणुन आम्ही तुमचे लाभांत हे खरेदीखत लिहून दिलेले आहे.

(३) **हस्तातरणाचा अधिकार** :- तुम्हांस या करारनाम्याअन्वये जी मिळकत हस्तातंरीत केली आहे.ती मिळकत जमीनमालकांचे मालकीची आहे.जमीन मालकां शिवाय सदर मिळकतीमध्ये इतर कोणासही,कोणत्याही प्रकारचे राईटस् टायटल,इंटरेस्टइस्टेट अगर मालकी हक्क नाहीत.(यापुढे यांचाउल्लेख हक्क व अधिकारअसा केलाआहे.)सदरची मिळकत व त्यातील जमीन मालकांचे व संमती देणार यांचे हक्क व अधिकार कोणत्याही मार्गाने विक्रीवर्ग ,असाईन, हस्तातंरीत,तबदिल,अभिहस्ताकंन,व नामांतरीत करण्याचा अगर ट्रान्स्फर ऑफ प्रापर्टी ॲक्टमध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही स्वरुपांत हस्तातंरण करण्याचा त्यांना विनाशर्त अधिकार आहे. (यापुढे या अधिकाराचा उल्लेख हस्तातंरण अगर हस्तातंरीत असा केला आहे.)या हक्कांवर व अधिकारांवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध नाही.सदर हक्कांचा व अधिकारांचा कोणत्याही करारान्वये संकोच करण्यात आलेला नाही.अगर त्यावर मर्यादा घालण्यांत आलेल्या नाहीत. कोणत्याही कौटुंबिक व्यवस्थेमध्ये सदर अधिकारांनां सिमीत करण्यांत आलेले नाही.कोणत्याही मृत्यूपत्रातील अगर बक्षिसपत्रातील अगर इतर कोणत्याही दस्तऐवजामधील तरतुदीन्वये सदर मिळकतीच्या आमच्या हक्कांच्या व अधिकारांच्या हस्तातंरणा वर कोणत्याही प्रकारचे निर्बंध मर्यादा अगर अटी घालण्यांत आलेल्या नाहीत. सदरची मिळकत ही फ्री होल्ड मिळकत आहे.

नसन १
६०९५/८.९५
२००१



**किमंत व कबजा** :-सदरप्लॉटची एकूण किमंत रक्कम रुपये **१,९५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंच्याण्णव हजार** मात्र) इतकी ठरली आहे सदरची संपुर्ण रक्कम तुम्ही संमती देणार नंबर २यांना दिली आहे.व ती संमती देणार नंबर २ यांना ती प्राप्त झाली आहे.त्या रक्कमेच्या भरण्याचा तपशिल या लेखाच्या शेवटी दिलेला आहे सदर रक्कमे ऐवजी सदरचा प्लॉट तुम्हांस कायम चा व फरोक्त खरेदी दिला आहे.

(५)**कबजा**:- सदर प्लॉटचा प्रत्यक्ष कबजा संमती देणार नंबर २यांनी आमचे संमती ने व सहमतीने तुम्हांस आजरोजी दिला आहे.कबजाबाबत तक्रार नाही.

(६) **मालकी हक्काचे हस्तातंरण**:-या खरेदीखताने तुम्ही सदरच्या प्लॉटचे पुर्ण मालक झालेले आहांत.सदरप्लॉटचा तुम्ही मालकी हक्का ने वंशपरंपरागत उपभोग घ्यावा.तुमच्या मालकी हक्कास अगर कबजे वहिवाटीस कोणीही कोणत्याही प्रकारची हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण संमती देणार व आम्ही आमचे पदर खर्चाने करुन देऊ .तुम्हांस त्याची तोषिश लागु देणार नाही.सदर प्लॉटमधीलआमचे व संमती देणार यांचे सर्व राइटस् टायटल,व इंटरेस्ट आम्ही पुर्णपणे तुमचे लाभांत विक्री,वर्ग, हस्तातंरीत असाईन अगर तबदिल केलेले आहेत. आमचेकडे अगर संमती देणार यांचेकडे सदर प्लॉटपैकी कोणते ही हक्क व अधिकार राखून ठेवलेले नाही

**यु.एल.सी. बाबतचा तपशिल**:- सदर प्लॉटला अर्बन लॅण्ड सिलींग अॅक्टच्या तरतुदी लागू आहेत.त्यातील तरतुदीप्रमाणे जमीन मालकांनी कलम १५ खाली रिटर्न दाखल केलेले होते.त्याबाबत सक्षम अधिकारीना.ज.क.म. यांना संदर्भ क्रंमाक ना.ज.क.म./अ-१/ एस.आर ./ २१९/९६ दिनांक ९/१२ /९६ व क्रंमाक ना.ज.क. म./ अ-१/एस. आर / २१९/ ९६ दिनांक२-११-९६वयु.एल.सी./अे-२/एस.आर.२२०/९६दि.४/११/९६व यु.एल.सी./अे-२/एस.आर.२२१ /९६दि. २/११/९६, ना.ज.क.म./अ-१/८७/१९९७ दि.३०/४/९८व ना.ज.क.म/अ-१/८८/१९९७ दिनांक ३०/४/९८ अन्वये आदेश दिलेलाआहे.अशा रितीने सदरचे क्षेत्र धारण करण्याचा जमीनमालकांना अधिकार प्राप्त झाला.

(८)**डी.पी.प्लॅन मधील परिस्थिती** :-सदरचा प्लॉट नाशिक महानगर पालिकेच्या डेव्हलपमेन्ट प्लॅनमध्ये रेसिडेसियंल झोनमध्ये सामाविष्ट आहे.

नसक्र १
७७५/८.९५
२००१



डेव्हलपमेन्ट प्लॅनमध्ये सदरच्या प्लॉटवर अगर क्षेत्रावर कोणत्या ही प्रकारचे रिझर्वेशन ठेवण्यात आलेले नाही.

(९) **कायमची व फरोक्त खरेदी ,वाजवी किमंत आणि भरणा**:-सदरचा प्लॉट आम्ही तुम्हांस कायमचा व फरोक्त खरेदी दिला आहे.तो उलट खरेदी देण्याची तोंडी अगर लेखी बोली नाही.ठरलेली किमंत बाजारभावाने योग्य व वाजवी आहे.किमंतीबाबत तक्रार नाही. किमंतीच्या रक्कमेचा संपुर्ण भरणा मिळालेला आहे.त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.

(१०) **खालील गोष्टी आम्ही जाहीर करतो की,व खात्रीने सांगून व भरवशाने लिहून देतो की,**

**मालकी हक्क**:- जमीन मालक हे सदर मिळकतीचे एकमेव मालक आहेत.व त्यांचेशिवाय सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क अगर हितसंबध नाही.

**कबजा**:- कलम १ मध्ये नमूद केलेल्या सर्व्हे नंबरची मिळकत संमती देणार यांचे कबजात देणेपुर्वी जमीनमालकांचेच कबजांत व वहिवाटीत मालकी हक्काने होती.जमीन मालकांनी त्यामध्ये कोणासही कुळ म्हणुन घातलेले नव्हते अगर ती कोणासही वहिती करण्यांस दिलेली नंव्हती.या लेखाचा विषय असलेली प्लॉट मिळकत यापुर्वी संमती देणार यांनी कोणाच्याही कबजांत दिलेली नाही.

**कर्ज:-** सदरच्या मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे कर्ज घेण्यांत आलेले नाही.सदरची मिळकत कोणाकडेही गहाण,दान,तारणअगर प्लेज केलेली नाही.सदर मिळकतीवर कोणाचाही चार्ज नाही.सदर मिळकतीचे टायटल डिडस् कोणाकडेही गहाण,निर्माण करण्याच्यां हेतुने डिपॉझिट करण्यात आलेले नाही.

**हस्तांतरण**:-या लेखात वर नमूद केल्याप्रमाणे सदरची मिळकत यापुर्वी कोणास ही कोणत्याही प्रकारे हस्तातंरीत करण्यातं आलेली नाही. अगर तसा कोणताही तोंडी अगर लेखी असा व्यवहार करण्यात आलेला नाही.

**वाद** :- सदरच्या मिळकतीबाबत कोणताही वाद,कोणत्याही कार्यालयात

नसन १
८८०५/७९५
२००१



,कोर्टात अगर शासकीय कार्यालयात पेडींग नाही.सदर मिळकतीचे हस्तांतरण करु नये. असा कोणत्याही कोर्टाचा मनाई हुकूम नाही. सदरची मिळकत कोणत्याही कोर्टाच्या हुकूमामुळे अव्वल जप्तीने जप्त झालेली नाही.सदरची मिळकत कधीही जप्त झालेली नव्हती व नाही.

**संपादन**:-सदर मिळकत कोणत्याही कायद्यान्वये ॲक्वायर झालेली नाही.अगर तशी नोटीस आजतागायत आलेली नाही. यु.एल.सी. कायद्या तील कलम १०अन्वये सदरची मिळकत संपादंन करण्याचा प्रस्ताव नाही. अगर या कलमा खाली संपादनांचे कोणतेही प्रोसिडींग सुरु झालेले नाही.

**चार्ज अगर बोजा:-**सदर मिळकतीवर कोणाचेही पोटगीचा अगर चोळी बांगडी चा अगर लग्नांचे खर्चाचा चार्ज नाही.जमीन मालकां शिवाय सदर मिळकतीचे मालकी हक्कां मध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क अगर हितसंबध नाही. सदर मिळकतीचे मालकी हक्कांमध्ये इतर कोणाचा ही कोणत्याही प्रकारे हक्क अगर हितसंबध नाही.सदर मिळकत कोणत्या ही जडजोखमीत गुंतविण्यात आलेली नाही.सदर मिळकतीचे हस्तांतंरण केंले जाणार नाही. असे अंडरटेकीग कोणीही कोणत्याही कोर्टात अगर कार्यालयात दिलेले नाही.सदर मिळकतीचा वापर करुन कोणीही कोणास ही जामिनीकी दिलेली नाही.सदर मिळकत कोणत्याही सहकारी सोसायटीच्या डिक्लेरेशनमध्ये अडकविलेली नाही. सदर मिळकतीवर कोणत्याही कर्जाचाबोजा नाही.

**शेती लॅन्ड सिलींग :** महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल लॅण्डसिलींग ॲक्टच्या तरतूदी अन्वये सदर मिळकतीपैकी कोणतेही क्षेत्र अतिरिक्त म्हणुन घोषित करण्यात आलेले नाही.

**आदिवासी**:- सदरची मिळकत आदिवासी व्यक्तीच्या मालकीची नाही.

**इनाम अगर वतन**:- सदरची मिळकत वतनाची अगर इनामांची नाही.

**टायटल:-** अशा रितीने सदर मिळकतीचे टायटल स्वच्छ व निर्दोष व बिनबोजाचे आहे.त्यामध्ये कोणत्याही प्रकारची कसर नाही.सदर मिळकती च्या मालकी हक्कांबाबत तुम्ही खात्री करुन घेतली आहे.

नक्कल १
२०७५ /९०१९५
२००१



(११) **यु.एल.सी.परवानगी:-** अर्बन लॅन्ड सिलींग अॅक्टच्या २६ अन्वये आवश्यक असलेली परवानगी सक्षम अधिकारी नाजकम नाशिक यांनी त्यांचा आदेश नंबर युएलसी /अे२-२/ एस आर.२६/५७२/ दिनांक २७/४/ २००१ अन्वये दिलेली आहे.

(१२) **इतर परवानग्या:-** नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या क्रंमाक जा. नं. नगररचना/अंतिम सिडको /बी-१/३२/ दिनांक ३०/११/९९ च्या पत्रान्वये सदर मिळकतीचा लेआऊट अंतिमरित्या मजूंर केलेला आहे. जिल्हाधिकारी नाशिक यांच्या क्रंमाक बिनशेती/एस.आर./३४८अ/९९/३४६अ/९९दिनांक २३-५-२०००च्या आदेशान्वये सदरचा प्लॉट बिनशेतीकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अशारितीने सदरचा प्लॉट बिल्डेबल आहे. वर नमूद केलेल्या आदेशाव्यतिरिक्त सदर प्लॉटच्या हस्तातंरणासाठी इतर कोणत्याही परवानगीची अगर नाहरकत दाखल्याची आवश्यकता नाही.

(१३) **कर** :-सदर मिळकतीचे आजपावेतोचे सर्व कर,संमती देणार यांनी भरलेले आहेत.यापुढील कर तुम्ही भरावयाचे आहेत.

(१४)**दस्तऐवज खर्च:**-सदरच्या खरेदीखतासाठी स्टॅम्प डयुटि रजि स्टेशन व जो अनुशंगिक खर्च झालेला आहे.तो सर्व खर्च तुम्ही केलेला आहे.व सोसलेला आहे.

(१५) या खरेदीखताने खरेदी दिलेल्या क्षेत्राच्या किमंतीचा संपुर्ण भरणा आंम्हास खालीलप्रमाणे

| **रक्कम रुपये** | **तपशिल,** |
|---|---|
| १५,००० /- | (अक्षरी रक्कम रुपये **पंधरा हजार** मात्र)चा भरणा रोखीने मिळाला . |
| १,८०,०००/- | (अक्षरी रक्कम रुपये **एक लाख ऐंशी हजार** मात्र )चा चेक नं.७४७७६०दि.२०/७/२००१ बॅन्क ऑफ बडोदा शाखा नासिक अन्वये मिळाले. |
| १,९५,०००/- | (एकुण रक्कम रुपये **एक लाख पंच्याण्णव हजार** मात्र) चा भरणा आजपावेतो वेळोवेळी रोखीने व चेकअन्वये संमती देणारं नंबर २ यांना मिळाले. |

नसन १

२००१



लिहुन घेणार,
**सौ. जयश्री नित्यानंद भामरे** सही ----------------

लिहून देणार,

**श्री. बद्रुन्निसा मेहमूदखान पठाण व इतर** यांचेतर्फे
जनरल मुखत्यारपत्र धारक-
मेसर्स, नेत्रा कन्स्ट्रक्शन, भागिदारी फर्म तर्फे
भागिदार **श्री. संतोष विश्वनाथ कारखानीस**

**संमती देणार नंबर १**

**मेसर्स, नेत्रा कन्स्ट्रक्शन**, भागिदारी फर्म
तर्फे भागिदार- **श्री. संतोष विश्वनाथ कारखानीस**

**संमती देणार नबंर २**

**मे. एन्. के. बिल्डर्स**, भागिदारी फर्म तर्फे
भागिदार- **सौ. प्रज्ञा विठ्ठल खानकरी**, सौ. प्रज्ञा वि. खानकरी.

साक्षीदार - १) ------------ २) ------------

## LETTER

Office of the Additional Collector
& Competent Authority, Nashik
No. ULC.A-2-2/SR-26-/572 /2001.
Nashik, Date : 19/4/2001.

नसन १
९४९९/९४९९
२००१

To,

Shri/Smt. Badrunisa Mahmoobkhan Pathan
& others through their
G.P.A. Holder Shri. S.V. Karkhanis.

Sub. : Urban Land (Ceiling & Regulation) Act 1976.
Notice under Section 26(1) Permission for

Ref. : 1) Your Notice dated 9-4-2001 under Section 26(1)
of the Urban Land (Ceiling & Regulation) Act 1976.

It appears from your notice dated 9-4-2001 that you intend to sell the plots to the person shown below :

| Village | S.No./G No. C.T.S. No. | Plot No. | Area in Sq.Mtrs As per 7/12 | Name of the Transferee |
|---|---|---|---|---|
| Nashik | 762/2/1+2/2 + 763/1/1+1/2+1/3/A+1/4A | 96 | 166.50 | Sou. Jayshri Nityanand Bhambar |
| | -"- | 80 | 174.00 | Shri. Rajendra Ramdas Pingale. Sou. Sangita Rajendra Pingale. |
| | -"- | 81 | 176.00 | Sou. Pushpa Subhash Pingale. |
| | -"- | 82 | 176.00 | Sou. Aruna Suresh Pingale. |
| | -"- | 83 | 176.00 | Shri. Suresh Ramdas Pingale. Shri. Subhash Ramdas Pingale. |
| | -"- | | | |

This is to inform you that Competent Authority, U.L.C. Nashik does not intend to purchase the land intended to be sold by you.

It shall, therefore be lawful to transfer the aforesaid land to the aforesaid person by way of sale.

This letter is issued without prejudice to the obligation case on both the Transferee and Transferer by virtue of the provision of the Urban Land (Ceiling & Regulation) Act 1976 and the provision of any other law or enactment for the time being in force.

27/4

**Addl. Collector & Competent Authority,**
**Urban Land Ceiling, Nashik.**

Copy to :

1) The Sub-Registrar, Nashik/Nashik Road.
2) Talathi Nashik
3) Shri/Smt. Sau, Jayshri Nityanand Bhambare & others 66 )
4) Shri./Smt.
5) Shri./Smt.

नसन १
७७९५/९३१९५
२००१

अनुक्रमांक - ७७९५
सन २००१ चे पुस्तक
23 दिनांक 3 ते ४
दरम्यान दुय्यम निबंधक नाशिक-१
यांचे कार्यालयात हजर केला.

दुय्यम निबंधक, नाशिक-१.

| | |
|---|---|
| फी घेतली ती | रु. पै. |
| नोंदणी | ३१७० — |
| फोटो कॉपी | ७० — |
| शेरा | २- |
| रुजवात | २- |
| फायलिंग | १२- |
| मेमो | |
| टपाल | |
| एकूण | ३२५६-०० |

दुय्यम निबंधक, नाशिक-१.

१) श्रीमती. बदुन्निसा महेमुदखान पठाण
२) श्री. इकबाल महेमुदखान पठाण
३) श्री. खलिल महेमुदखान पठाण
४) श्री. खालिद महेमुदखान पठाण
५) श्री. नादीर खलील पठाण
६) श्रीमती. नजमुन्नीसा रमजानखान पठाण
७) अल्ताफमुन्नीसा अब्दुलसमद शेख
८) सादिक सर्फराज पठाण
९) कमरुन्नीसा महंमद शाफियोदीन शेख
१०) अंजुमंदबानो इकबाल शेख
अ) इकबाल महंमद शेख
ब) कु. निगार इकबाल शेख
क) मुकीद इकबाल शेख
अज्ञानपालन नंबर २ इकबाल महंमद शेख
११) श्रीमती. जैबुन्नीसा अब्दुललतीफ पठाण
१२) श्री. शफिक अब्दुललतीफ पठाण
१३) श्री. अख्तर अब्दुललतीफ पठाण
१४) सौ. शकीरा दबीर शेख
१५) सौ. नसीम रसिद खान
१६) सौ. फहमिदा महंमदहुसैन शेख
नं. ११ व १२ यांचे ज.म
१७) श्री अमृतराव त्र्यंबकशेठ खैरनार
१८) श्री सतिश दत्तात्रय चव्हाण
१९) श्री निंबादास नथु बागुल
२०) सौ कल्पना शांताराम सावळे
२१) श्री शशीकांत पुंडलिक वाणी
२२) श्री रविंद्र पंढरीनाथ जगताप
२३) श्री उदयकांत तुकाराम साखरेकर
२४) श्री विजय अमृतराव खैरनार
२५) कु रुपाली शांताराम साबळे
२६) सौ अनिता नितीन बागुल
२७) श्री पुंडलिक वेडुशेठ वाणी
२८) श्री संजय तुकाराम साखरेकर
२९) श्री राजेंद्र तुकाराम साखरेकर
३०) सौ उषा शांताराम साबळे
३१) सौ कल्याणी आनंद पवार,
लिहून देणार नंबर १७ ते २० व
२१ ते ३१ तर्फे जनरल मुखत्यार पत्र

धारक म्हणुन नं. २१. श्री. शशीकांत
पुंडलिक वाणी, या सर्वांचे ज. मु. धारक - १ ते ३२ लि.दे.
यांचे ज. मु. म्हणून
श्री संतोष विश्वनाथ कारख्यानिस
२४, व्यापार, रा. मेरी, नाशिक
हे - मे. नेहा कॅन्स्ट्रक्शनचे
भागीदार म्हणून - सं. देणार १

मेसर्स नेहा कंन्स्ट्रक्शनचे भागीदार
सौ प्रज्ञा विठ्ठल खानकरी,
यांचे वतीने मुखत्यारपत्रधारक म्हणुन
श्री. माधवराव शंकरराव जुगत, सज्ञान
नाशिक हे त्यांचे ओळख पटवितात. - सं. देणार २

नसन १
७७९५/९८९५
२००१

दस्तऐवज करुन देणार
तथाकथीत खरेदीचा
दस्तऐवज करुन दिल्याचे कबुल करतात.

१) [signature]
२) [signature]
३) [signature]

नसन १

९७९५/१५१९५

२००१

श्री संदीप विश्वनाथ दवाभुत

रा विजयपार्क गंगापुर रोड नाशिक

[illegible] निबंधकास माहित असलेले [illegible] असे निवेदन करतात की, हे दस्तऐवज करून देणाऱ्या [illegible] इसमास व्यक्तिशः जाणतात आणि त्याची ओळख पटवितात.

दिनांक २३ माहे ७ सन २००१

दुय्यम निबंधक, नाशिक-१

पुस्तक क्रमांक एक
९७९५ क्रमांक वर
नोंदला.

दुय्यम निबंधक, नाशिक-१
दिनांक 23 माहे ७ /२००१

नक्कल अर्ज क्रमांक ९५२६
नक्कल दिनांक :-
नक्कल पुर्ण झाल्याचा दिनांक ११/१०/२०२४
नक्कल समक्ष दिली दि.

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-१.

SEAL OF THE SUB-REGISTRAR, NASIK-1. दुय्यम निबंधक नाशिक-१ यांची मुद्रा

End Page

मी नक्कल केली
मी वाचली
मी रुजवात घेतली

मी वाचले
मी रुजुवात घेतली

९७९५/०१

अस्सल बरहुकुम नक्कल

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-१.

अस्सल बरहुकूम नक्कल

दुय्यम निबंधक, नाशिक-१.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASIK-1

20 Rs. INDIA TWENTY RUPEES